## प्रत्येक उमेदवाराची पात्रता खालीलप्रमाणे –

१) उमेदवार हा सारथी लक्षित गटातील (मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी) असावा.

२) उमेदवाराकडे महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र असावे. (तहसीलदार यांचे महाराष्ट्राचा रहिवाशी असल्याबाबत प्रमाणपत्र (Domicile Certificate)

३) उमेदवार हा नॉन- क्रिमिलेयर असावा.

४) उमेदवाराकडे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले जातीचे प्रमाणपत्र असावे.

५) मराठा जातीच्या उमेदवाराकडे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले जात प्रमाणपत्र असावे आणि नॉन- क्रिमीलेयर प्रमाणपत्र किंवा मागील ०३ वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र असावे. (उपविभागीय अधिकारी / तहसिलदार यांचे प्रमाणपत्र)

६) मराठा जातीच्या उमेदवाराकडे जातीचे प्रमाणपत्र नसल्यास EWS/SEBC प्रमाणपत्र असावे. (सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र)

७) कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जातीच्या उमेदवाराकडे जातीचे प्रमाणपत्र आणि नॉन- क्रिमीलेयर प्रमाणपत्र किंवा मागील ०३ वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र असावे.

८) निवड केलेल्या कोर्ससाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.

९) उमेदवाराचा जन्माचा दाखला किंवा १० वी चे प्रमाणपत्र जोडावे.

१०) उमेदवाराचे आधार कार्ड जोडावे.

११) उमेदवाराने ऑनलाईन ॲप्लिकेशन सोबत आवश्यक प्रमाणपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.